**लघुवाद न्यायालय, लोकमान्य टिळक मार्ग,**
**धोबी तलाव, काळबादेवी, मुंबई - ४०० ००२**
**दूरध्वनी क्र. ०२२-२२०८८७००/२२०८८७००**
Email: scc-mumbai@bhc.gov.in

## <u>दरपत्रक सुचना</u>

लघुवाद न्यायालय, मुंबई या न्यायालयाच्या धोबी तलाव, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई - ४०० ००२ येथील मुख्य कार्यालयातील व भास्कर इमारत, वांद्रे शाखा, मुंबई - ४०० ०५१ येथील इमारतीमधील न्यायालयीन कक्ष, न्यायाधीश दालने, विभाग व इतर ठिकाणी बसविण्यात आलेल्या अग्निशमन यंत्रांमध्ये **दरवर्षीप्रमाणे एकूण ३ वर्षांसाठी** नव्याने वायू/रसायनांचा भरणा करणे आवश्यक आहे.

या न्यायालयातील अग्निशमन यंत्रांमध्ये वायू/रसायनांचा तपशील खालील प्रमाणे.

| **Head Office** | **Bandra Branch** |
|---|---|
| • Refilling of Dry Chemical Powder Type Fire Extinguisher (6 kg. Capacity) – 115 | • Refilling of ABC Store Pressure Fire Extinguishers (9 kg. Capacity) – 13 |
| • Refilling of Dry Chemical Powder Type Fire Extinguisher (9 kg. Capacity) – 10 | • Refilling of Water Co2 type Fire Extinguishers (9 Ltr. Capacity) – 12 |
| • Refilling of Water CO2 Type Fire Extinguisher (9 Ltr. Capacity) – 32 | • Refilling of ABC Store Pressure Fire Extinguishers (5 kg. Capacity) – 17 |
| • Refilling of Dry Chemical Powder ABC Fire Extinguishers (5 kg. Capacity) – 03 | • Refilling of ABC Store Pressure Fire Extinguishers (2 kg. Capacity) – 1 |
| **Total 160** | **Total 43** |
| **<u>Grant Total 203</u>** | |

तरी इच्छुक ठेकेदारांनी **दरवर्षीप्रमाणे एकूण ३ वर्षांच्या** कालावधीसाठी याप्रमाणे आपली कागदपत्रे व दरपत्रक तांत्रिक व आर्थिक अशा **मोहोरबंद लखोटयात,** त्या लखोटयाच्या वरच्या भागावर मोठया अक्षरात **"<u>Quotation for Refilling of Fire Extinguishers</u>"** असे लिहून त्या **"प्रबंधक, लघुवाद न्यायालय, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई - ४०० ००२ "** यांच्याकडे दरपत्रक सूचना प्रसिद्ध केल्यापासून **दिनांक १४ ऑगस्ट, २०२५ रोजी दुपारी २.००** वाजेपर्यंत किंवा तत्पूर्वी पोहोचतील अशा पध्दतीने पाठवाव्यात. तद्नंतर आलेल्या दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही. सदर सविस्तर दरपत्रक सुचनांची माहिती शासनाच्या **http://www.bombayhighcourt.nic.in** व **http://sccmumbai.dcourts.gov.in** या संकेतस्थाळावर उपलब्ध आहेत.

लघुवाद न्यायालय, }
}
मुंबई :- २५ जुलै, २०२५ }

(निलम शाहीर)
प्रबंधक

**लघुवाद न्यायालय, लोकमान्य टिळक मार्ग, धोबी तलाव, काळबादेवी,**
**मुंबई – ४०० ००२.**

**जाहीर सुचना**

**या न्यायालयाच्या मुख्य कार्यालयातील व वांद्रे शाखेतील इमारतींमध्ये दर वर्षीप्रमाणे एकूण ३ वर्षांच्या कालावधीसाठी निकामी झालेल्या अग्निशमन उपकरणांमध्ये (Fire Extinguishers) वायु/ रसायन भरणा (Refilling) करण्यासाठी जाहीर दरपत्रकाची प्रक्रिया अंमलात आणावयाच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे :**

| | |
|---|---|
| १. | दरपत्रकधारकाने/संस्थेने महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय, (Directorate of Maharashtra Fire Services) मुंबई, एच. बी. मार्ग, कोलीवरीगांव, यशवंत नगर, कलिना, सांताक्रुझ, पूर्व, मुंबई - ४०० ०९८ या अंतर्गत नोंदणीकृत परवान्याची साक्षांकित प्रत जोडणे आवश्यक आहे. |
| २. | दरपत्रकधारकाने/संस्थेने आयकर रिटर्न भरले बाबत मागील तीन वर्षाच्या साक्षांकित प्रत, सेवाकर प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत, पॅन कार्ड, जी.एस.टी. क्रमांक, इत्यादी कागदपत्रांच्या साक्षांकित केलेल्या छायांकीत प्रती देखील निविदेसोबत सादर करणे आवश्यक आहे. तसेच त्यांचे पुर्ण पत्रव्यवहाराचा पत्ता, ई-मेल आयडी, दुरध्वनी क्रमांक/भ्रमणध्वनी क्रमांक दरपत्रक पाकीटावर ठळक अक्षरात नमूद करावे. |
| ३. | दरपत्रकधारकाने/संस्थेने यापूर्वी ज्या ठिकाणी अग्निशमन उपकरणांमध्ये वायु/रसायन भरणा केलेला आहे, त्याचा तपशील व सदर संस्थेने/कार्यालयाने वितरित केलेले सदर कामाबाबतचे प्रमाणपत्र/पत्र दरपत्रकासोबत सादर करणे आवश्यक आहे. |
| ४. | दरपत्रकाधारकाने/संस्थेने तांत्रिक व आर्थिक दरपत्रक हे विहित नमुन्यात मोहोरबंद लखोटयाच्या वरच्या भागावर मोठया अक्षरात **"अग्निशमन उपकरणांमध्ये (Fire Extinguishers) वायु/रसायन भरणा करण्यासाठी दरपत्रक"** असे लिहून त्या **"प्रबंधक, लघुवाद न्यायालय, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई - ४०० ००२"** यांच्याकडे **दिनांक १४ ऑगस्ट, २०२५ पर्यंत दुपारी २.०० वाजेपर्यंत** किंवा तत्पूर्वी पोहोचतील अशा पद्धतीने पाठवाव्यात. **आर्थिक दरपत्रकाचा लखोटा हा तांत्रिक दरपत्रकाच्या लखोटयात बंद करून पाठवावा.** |
| ५. | दरपत्रक शुल्क (Tender Fees INR) रक्कम म्हणून रुपये १,७००/- (रुपये एक हजार सातशे फक्त) (विनापरतावा) व बयाना रक्कम (EMD INR) म्हणून रुपये ८,५००/- (रुपये आठ हजार पाचशे फक्त) (परतावा व्याजरहित) चे धनाकर्ष (Demand Draft) दरपत्रकासोबत देणे आवश्यक आहेत. **"प्रबंधक, लघुवाद न्यायालय, मुंबई – ०२"** या नावाने वरील प्रमाणे धनाकर्ष सोबत दिलेले नसतील तर सदर दरपत्रक स्विकारले जाणार नाही. जे दरपत्रक स्विकारले जाईल त्यांची बयाना रक्कम करार संपेपर्यंत ठेवण्यात येईल व इतर दरपत्रकाधारकांची बयाना रक्कम परत करण्यात येईल. (दरपत्रक फी रक्कम व बयाना रक्कम धनाकर्षाद्वारे (Demand Draft) दरपत्रकासोबत दयावयाचे आहेत.) |

| | |
|---|---|
| ६. | सुक्ष्म व लघु मध्यम उद्योग विकास अधिनियम - २००६ अंतर्गत उत्पादक म्हणून नोंदणीकृत असलेल्या सुक्ष्म व लघु उत्पादक उद्योगांना व शासकीय मंडळ/महामंडळ/उपक्रमांतर्गत नोंदणीकृत असलेले उत्पादक व पुरवठादार यांना दरपत्रक शुल्क व बयाना रक्कम भरण्यापासून सूट देण्यात येईल. परंतु सदरचे प्रमाणपत्र त्यांच्याकडे उपलब्ध असणे गरजेचे आहे. वर नमुद नोंदणी प्रमाणपत्र तांत्रिक निवेदनात जोडणे बंधणकारक असेल. तसेच ज्या दरपत्रकधारकांकडे सदरचे प्रमाणपत्र नसेल तर त्यांना दरपत्रक शुल्क व बयाना रक्कम भरावी लागेल. |
| ७. | तांत्रिक व आर्थिक निविदा हया संबंधीत समितीच्या निर्णयानुसार नमुद दिवशी या न्यायालयाच्या संबंधीत समितीसमोर उघडण्यात येतील. त्यावेळेस दरपत्रकाधारकाने किंवा अधिकृत प्रतिनिधी यांनी हजर राहावे. त्यावेळेस हजर नसलेल्या दरपत्रकाधारकांची कुठल्याही स्वरुपाची तक्रार विचारात घेतली जाणार नाही. |
| ८. | २०३ अग्निशमन उपकरणांमध्ये वायू/रसायनांचा भरणा करावयाचा असल्याने सदरची रक्कम तपशीलवार दरपत्रकांमध्ये दाखल करावयाची आहे. |
| ९. | दरपत्रकधारक सहभागी दरपत्रक प्रक्रियेमध्ये कोणत्याही टप्यावर जाहीर दरपत्रकातून माघार घेतल्यास त्यांची बयाना रक्कम जप्त करण्यात येईल. |
| १०. | मा. मुख्य न्यायाधीश साहेब यांना जाहीर दरपत्रक प्रक्रिया रद्द किंवा त्यामध्ये बदल करण्याचे पूर्ण अधिकार राहतील. त्याबद्दल कोणतीही तक्रार वा आक्षेप स्विकारले जाणार नाहीत. |
| ११. | निश्चित केलेल्या दरपत्रकाधारकाने/संस्थेचे देयक पारित करण्यासाठी **कार्यालयीन प्रक्रिया पुर्ण केल्यानंतर** सदरचे देयक अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई येथे पाठविण्यात येईल व ते मंजूर झाल्यानंतरच दरपत्रकधारकाला रक्कम धनादेशाद्वारे अदा करण्यात येईल. याप्रमाणे प्रति वर्षी देयक अदा करण्यात येईल. रक्कम अदा करण्यासाठी देयकासोबत पॅन कार्ड, आधार कार्ड, रद्द धनादेश तसेच बॅकेच्या खाते पुस्तकाचे पहिले पान व अदाता नोंदणी प्रमाणपत्र यांची छायांकित प्रत देणे अनिवार्य आहे. |
| १२. | तांत्रिक निविदा उघडण्याच्या दिवशी संबंधीत दरपत्रकधारकाने/संस्थेने जी कागदपत्रे निविदेमध्ये सादर केली आहेत त्या कागदपत्रांच्या मूळ प्रती समितीसमोर दाखवणे बंधनकारक राहील. |
| १३. | तांत्रिक निविदा उघडल्यानंतर त्यापैकी फक्त पात्र झालेल्या दरपत्रकधारकांचा/संस्थेंचाच आर्थिक निवेदेसाठी विचार करण्यात येईल. तांत्रिक निविदेमधून अपात्र दरपत्रकधारकांना/संस्थेना पुढील प्रक्रियेतून बाद करण्यात येईल. |
| १४. | **वेळापत्रक**<br>१. दरपत्रक स्विकारण्याची अंतिम तारीख :- १४/०८/२०२५ रोजी दुपारी ०२.०० पर्यंत<br>२. तांत्रिक निविदा (कागदपत्रे पडताळणी) :- १९/०८/२०२५ रोजी सायंकाळी ०५.०० वाजता<br>३. आर्थिक निविदा (दरपत्रक उघडणे) :- २१/०८/२०२५ रोजी सायंकाळी ०५.०० वाजता |
| १५. | अग्निशमन उपकरणांमध्ये वायु/रसायन भरणा करण्यासाठी आवश्यक खर्च जसे वाहतूक व इतर गोष्टीची जबाबदारी संबंधीत संस्थेची असेल. |
| १६. | दरपत्रकधारकाने/संस्थेने सादर केलेले दर ३ वर्षांसाठी लागू राहतील. |

१७.

# दरपत्रक नमुना

**Head Office**

| Sr. No. | Description Of Articles | No | Unit Rate | Unit Rate With GST & Tax | Total Amount for Year | Total Amount for 3 Years |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Refilling of Dry Chemical Powder Type Fire Extinguisher (6 kg. Capacity) | 115 | | | | |
| 2 | Refilling of Dry Chemical Powder Type Fire Extinguisher (9 kg. Capacity) | 10 | | | | |
| 3 | Refilling of Water CO2 Type Fire Extinguisher (9 Ltr. Capacity) | 32 | | | | |
| 4 | Refilling of Dry Chemical Powder ABC Fire Extinguishers (5 kg. Capacity) | 3 | | | | |
| | Total | 160 | | | | |

**Bandra Branch**

| Sr. No. | Description Of Articles | No | Unit Rate | Unit Rate With GST & Tax | Total Amount for Year | Total Amount for 3 Years |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Refilling of ABC Store Pressure Fire Extinguishers (9 kg. Capacity) | 13 | | | | |
| 2 | Refilling of Water Co2 type Fire Extinguishers (9 Ltr. Capacity) | 12 | | | | |
| 3 | Refilling of ABC Store Pressure Fire Extinguishers (5 kg. Capacity) | 17 | | | | |
| 4 | Refilling of ABC Store Pressure Fire Extinguishers (2 kg. Capacity) | 1 | | | | |
| | Total | 43 | | | | |

**Grand Total 203**

लघुवाद न्यायालय, मुंबई }
}
दिनांक: २५ जुलै, २०२५ }

(निलम शाहीर)
प्रबंधक

/home/minorwork/Desktop/Minor work sachin sir/Minor work sachin sir/home/minorwork/Minor Work fr.2017/Fire Extiguishner/Fire Extingushers.odt